FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154225

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. १० , वर्ष २२ , दिनांक १०/३/२२
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार ............, तारीख पासून २/३/२० , वेळ ............, तारीख पर्यंत २२/३०/२२ , वेळ १९:४५
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २२/३०/२२ , वेळ १६.००.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेया सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २२/२२ , तारीख १०/३/२२ , वेळ ११:४०.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ............, लेखी / तोंडी Written / Oral ............

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव टी. वॉर्ड, ठिकाणाचे नंबर ............, गल्ली ............, रस्त्याचे नाव देविदयाल रोड.
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण मुलुंड (प) गाव ............, पोस्ट ............, तालुका मुंबई जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name मुकेश ठक्कर
(b) वडिलांचे / पतीचे नाव प्रमोद ठक्कर
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ५२ वर्षे.
Date of Birth and Age
(d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९५२०६००५९२
Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ............, दिल्याचा दिनांक ............ दिल्याचे ठिकाण ............ (f) व्यवसाय ............
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू , जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
(h) पत्ता रूम २६ , गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. २६ फोन / मो. नं. ............ पॅन नं. ............ वोटर्स नं. ............
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव नेताजी सुभाष रोड , जवळचे प्रसिद्ध ठिकाण ............, गाव मुलुंड , पोस्ट मुंबई , पो. स्टे. ............
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ............, जिल्हा मुंबई . राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ............
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
संजय चव्हाण सह. दुय्यम निबंधक, टी. वॉर्ड मुलुंड मुंबई महानगरपालिका
मालिक, मुंबई मुलुंड (प)

जबाब

यातील फिर्यादी नामे श्री मुकेश सताप ठक्कर रा.ठि. रूम नं. ९८ नेताजी सुभाष रोड, मुंबई. मुलुंड यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर घेण्यात केला आहे. तोच गुन्ह्याची प्रथम खबर नोंदविण्यात येत आहे.

समक्ष

अमीन म्हात्रे
पोलीस निरीक्षक
का.स.वि. मुंबई

M.P. [signature]
17/3/22

जबाब दिनांक १७/०३/२०२२

श्री. मुकेश प्रताप ठक्कर उर्फ चिकु, वय– ५२ वर्षे, व्यवसाय– प्लंबींग कॉन्ट्रॅक्टर, रा.ठी.–रू.नं. १८, नेताजी सुभाषचंद्र रोड, मुलुंड, मुंबई. मो.क्र..–९८२०६००८९१.

––––––०००००––––––

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर कुटुंबासह मागील ३५ वर्षापासून राहावयास आहे. मी प्लंबिग कॉन्ट्रॅक्टर असुन सदरच्या व्यवसायात श्री अभय देशमुख हे माझे भागीदार आहेत. मी ईमारत, दुकाने यांचेकरीता मुंबई महानगर पालीकेकडुन पाण्याचे कनेक्शन मिळवून देण्याचे कामे करून देतो.

श्री. पन्नालाल बाबुलाल गुप्ता यांच्या दुकान नं. ०२, चंद्रव्हिला को.ऑ.हौ.सोसा., सिटीएस् नं. ८१० ए/२, ९० फुट रोड, मुंबई पूर्व या दुकानास मुंबई महानगर पालीकेकडुन पाणी कनेक्शन करून देण्याचे कॉन्ट्रॅक्ट मी घेतले आहे. श्री. गुप्ता यांचे वतीने मी दिनांक ०३/०६/२०१९ रोजी पाणी कनेक्शन करीता टी वॉर्ड, बृन्हमुंबई महानगर पालीका, देवीदयाळ रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई–८० मधील पाणी विभागास क्र. ९६०३ अन्वये अर्ज केला होता. त्यानंतर दिनांक ०२/०३/२०२० रोजी मी पाणी कनेक्शन मंजूर झाले व त्यासोबत रू. १६,५००/– डिपॉझिट, रू. ३६०/– मीटर फिक्सींग व रू.१८००/– ऍडव्हान्स कटींग चार्जेस असे एकुण रू.१८,६६०/– भरण्याचे आदेश झाले. त्यानंतर करोना आजार वाढल्याने श्री. गुप्ता व मी नमुद पैसे भरले नाहीत. त्यादरम्यान श्री. गुप्ता यांनी ज्या ईसमास त्यांचे दुकान भाडेतत्वावर दिले आहे ते श्री. संतोष देठे यांनी मला काहीही न कळविता परस्पर नमुद गाळयामध्ये अनधिकृत पाणी कनेक्शन घेतले. सदरची बाब मला कळल्यावर मी श्री. देठे यांना सदरची कृती चुकीचे असल्याचे सांगीतले. तद्नंतर ०२ ते ०३ महिन्यानंतर महानगरपालीकेने श्री. गुप्ता यांचे दुकानातील पाण्याचे कनेक्शन तोडुन टाकले.

श्री. गुप्ता यांचे भाडेकरू श्री. देठे यांनी दिनांक ०२/०३/२०२० रोजी मंजूर
झालेल्या अधिकृत पाणी कनेक्शनच्या कागदपत्रांचा पाठपुरवठा करण्यास सांगीतले व टी वॉर्ड
येथे जाण्यास सांगीतले. त्याअन्वये मी टी वॉर्ड येथील पाणी विभागाचे सब इंजिनिअर श्री
रंजीत चव्हाण यांची त्यांच्या कार्यालयामध्ये जावून भेट घेतली. त्यावेळी सब इंजिनिअर श्री
चव्हाण यांनी मला गुप्ता यांस अनधिकृत पाणी कनेक्शनचा दंड रू. १०,००,०००/–( दहा
लाख रूपये ) भरण्यास सांगीतला आणि दंड भरायचा नसेल तर त्यांना रू.१,६५,०००/–
लाच दयावी लागतील असे सांगीतले. त्यानंतर दिनांक २०/१०/२०२१ रोजी मी पुन्हा टी
वॉर्ड येथे पाणी विभागात जावून श्री. चव्हाण साहेब यांची भेट घेतली असता दंड माफ
करायचा असेल तर त्यांना रू १,६५,०००/– दयावेच लागतील असे पुन्हा सांगीतले. मला
लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक २२/१०/२०२१ रोजी लाप्रवि येथे तक्रारअर्ज दिला
होता. मी दिलेल्या लेखी तक्रारीची कारवाई करण्याकरीता पो नि म्हात्रे यांनी दोन पंचाना
बोलावले व पंचाना वाचण्यास देवुन त्यावर पंचाच्या सहया घेवुन सदरचा अर्ज त्यांनी स्वत:कडे
ठेवुन घेतला.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्याकरीता दिनांक २२/१०/२०२१
रोजी पो.नि. म्हात्रे यांनी मला व पंचाना पडताळणीबाबत सुचना दिल्यानंतर त्यांनी माझ्या

शर्टाच्या आतील बनियनवर व्हाईस रेकॉर्डर लावुन चालु करून मी व पंच श्री वसावे सब इंजिनिअर श्री चव्हाण यांची भेट घेण्याकरीता मला टि वार्ड, मुंलुंड येथे पाठविले होते. परंतु सदरवेळी चव्हाण हे त्यांच्या कार्यालयामधून निघून गेल्याने त्यांची भेट होवू शकली नाही. सब इंजिनिअर श्री चव्हाण यांची भेट न झाल्याने पो.नि. म्हात्रे यांनी मला सब इंजिनिअर श्री चव्हाण यांना मोबाईलवर संपर्क करून स्पिकर फोन ऑन करून बोलण्यास सांगीतले. सदरचे संभाषण व्हॉइस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर पो.नि. म्हात्रे यांनी दिलेल्या सुचनेवरून माझ्याकडील मो.क्र. ९८२०६००८९१ यावरून सब इंजिनिअर चव्हाण यांना संपर्क साधण्याकरीता मी कॉल केला व श्री चव्हाण साहेब यांच्याशी माझे कामासंदर्भात बोलल्यानंतर '' थोडा बहोत... वन सिक्स्टी फाय बहोत जादा.... वन लाख सिस्टी फाय थाऊजन बहोत जादा होता है साब.... '' असे सब इंजिनिअर श्री चव्हाण यांना बोललो. त्यानंतर सब इंजिनिअर चव्हाण यांनी '' नय कर दो ना... नही... नही...बाबा इसमें... इसमें और जादा कम करणे के लिए बोलो.... क्योंकी ऑलरेडी मैने बहोत कम कर लिया है इसमें....'','' तो हा... तो पार्टि को बोलो की तुम्हारा गलती है बोलो... इसे ज्यादा कम नही होगा....'','' एक... तू एक कम कर दे..... और बाकी आगे का तू जितना भरने का है ओ भर.... **और एक पैसट तक ओ फाईनल कर दे**...'','' मै... मेरे अलावा... बाबा पाच लोग है....'','' नर मॅडम.... नर मॅडम... नर मॅडम रहेंगा...ओ अपना एन एस रहेगा... जे. ई. रहेगा.... ए. ई. रहेगा....'','' आ जाईये लेकीन उसमे कम नही होगा उस में... उतना फाईनल रहेगा ओ...'',''एस... उतना ही रहेगा रक्कम...'' असे मला सांगीतले. दिनांक २५/१०/२०२१ रोजी सोमवारी कार्यालयामध्ये १,६५,०००/- सदर लाचेची रक्कम घेवुन भेटण्याकरिता बोलाविले.

दिनांक २५/१०/२०२१ रोजी सब इंजिनिअर चव्हाण यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम देण्याकरीता मी माझेकडील बचतीमधील रुपये ५०,०००/- ( रुपये ५००/- दराच्या १०० भारतीय चलनी नोटा) पो.नि. म्हात्रे यांना पंचासमक्ष दिले. उर्वरित १,१५,०००/- रक्कम ही ( रू.५००/- दराच्या २३०) या खेळण्यातील नोटा वापरण्याचे पो.नि. म्हात्रे यांनी पंचासमक्ष ठरविले. त्यानंतर मी सादर केलेल्या रूपये ५००/- दराच्या १०० भारतीय चलनी नोटांच्या झेरॉक्स काढुन घेतल्या व त्यावर पंचांनी सहया घेतल्या. सापळापुर्व कारवाईदरम्यान पो नि म्हात्रे यांनी अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर पो नि म्हात्रे यांनी सापळा कारवाईबाबतचे सर्व सोपस्कर पुर्ण करून माझे पॅटच्या डाव्या खिशात सदरची रक्कम ठेवण्यात आली व मला लाचेची रक्कम मागीतली जात नाही तोपर्यंत सदर रक्कमेस स्पर्श न करण्याबाबत सुचना दिल्या.

त्यांनतर मी पंच श्री.वसावे यांचेसह महानगरपालिका 'टी' वॉर्ड येथे सब इंजिनिअर श्री चव्हाण यांची भेट घेण्याकरीता गेलो तेव्हा सब इंजिनिअर चव्हाण यांनी मला सांगीतले की श्री. नागरे साहेब यांच्या सोबत बसुन काम करून घ्या तसेच एक्झीक्युटीव्ह यांच्याकडुन मान्यता करून घेण्याबाबत सांगितले तसेच सब इंजिनिअर म्हणाले की पहिले पैसे भरावे त्यानंतर भेट त्यानी पुढे असे बोलले की '' किधर भाग के आप जी जाने वाले नही मैं भी नही'' असे

M.I.Chavan
17/3/22

फिर्यादी श्री. मुकेश प्रताप ठक्कर उर्फ चिकु यांचा दिनांक १७/०३/२२ रोजीचा जबाब पुढे चालु....

बोलुन पहिले काम करण्यास सागितले. तसेच लोकसेवक म्हणाले की ए.ई. यांना सुध्दा दयावे लागतील शेवटी सब इंजिनिअर यांनी सागितले की गुप्ता कडे जावुन त्यांचे लेटर घेवुन यावे व पी फॉर्मची कॉपी सुध्दा लावावी असे बोलुन लोकसेवक श्री चव्हाण निघुन गेले. सापळा कारवाई दरम्यान सब इंजिनिअर श्री.चव्हाण यांनी मला प्रलंबित कामासबंधी कागदपत्रांची पुर्तता करण्यास सांगीतल्याने मी पुन्हा पोलीस पथक थांबले होत त्याठिकाणी गेलो.

त्यानंतर माझ्या खाजगी कामानिमित्त मी टी वार्ड येथे गेलो असता सब इंजिनिअर श्री. चव्हाण यांनी लाचेची रक्कम दिनांक ११/११/२०२१ रोजी घेवून येण्यास सांगीतले. सदरबाबतची माहीती मी पो.नि. म्हात्रे यांना दिली. दि. ११/११/२०२१ रोजी सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने मी सब इंजिनिअर चव्हाण यांची भेट घेण्यास गेले तव्हा सब इंजिनिअर श्री चव्हाण हे हेड ऑफिसला ट्रेनिंगला तिन दिवस गेले आहेत अशी माहीती मला मिळाली. त्यामुळे लाचेची रक्कम सब इंजिनिअर श्री चव्हाण यांना देता आली नाही. त्यानंतर श्री चव्हाण यांनी माझ्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी न केल्याने मी परस्पर टी वार्ड मध्ये जावून श्री चव्हाण यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी माहीती दिली की, श्री गुप्ता यांचे भाडेकरू श्री देठे यांनी दिनांक २५/१०/२०२१ रोजी कार्यालयामध्ये भांडण केल्याने ते दुखावले गेले आहेत व त्यामुळे ते गुप्ता यांच्या गाळयाचे काम करणार नाही आहेत. सदरबाबत मी टी वार्डमध्ये अधिक चौकशी केली मला माहीती मिळाली की, श्री चव्हाण यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये श्री चव्हाण हे कोणतेही काम करण्याकरिता नागरिकांकडुन पैशाची मागणी करतात अशा तक्रारी प्राप्त झाल्या असल्याने सब इंजिनिअर श्री चव्हाण हे त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही.

तरी मी यांनी दुकान नं.२, चंद्रव्हिला को.ऑप.हाउसिंग सोसायटी येथील पाण्याचे कनेक्शनकरिता कॉन्ट्रॅक्ट घेतले असुन, सदर गाळयाचे गाळाभाडेकरू श्री देठे यांनी अनधिकृत पाण्याचे कनेक्शन घेतल्याने आकारलेला दंड १०,००,०००/—रू हा माफ करण्याकरिता १,६५,०००/— रू लाचेची मागणी सब इंजिनिअर श्री रंजीत चव्हाण यांनी माझेकडे केली व सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केल्याने माझी सब इंजिनिअर श्री रंजीत चव्हाण यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई होणेकरिता तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीमध्ये टंकलिखीत केला असून मला मराठीतुन वाचून व हिंदीतून समजावून सांगीतला तो मी सांगीतल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(अमित सुधाकर म्हात्रे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

17/3/22

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ चौकशी अंती.

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी. यातील आरोपीताने फिर्यादी यांना कोर्टात केलेल्या गाळ्यातील, गाळेमालकांकडे केलेल्या आरोपित बाबत कारवाई करिता आकारलेल्या दंडाच्या रक्कम १०,००,०००/- माफ करण्याच्या बदल्यात १,६५,०००/- स्वतःच्या कार्यवाही करिता पारिश्रमिकापोटी, लाचेची रक्कम मागणी करून. सदरची रक्कम स्विकारण्याचे कबूल केले म्हणून गुन्हा क्र. ७ प्रमाणे कलम भ्र.प्र.प्रति अधि. १९८८ नुसार नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुंन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...................., जिल्हा ...................., राज्य ....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to....................................... (3) Transferred to P. S. ......................................

District.................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature] 12/01/22

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ अमित म्हात्रे

पदनाम Rank........ पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

नोटीस दिनांक १७/०३/२०२२

( कलम ४१ए (१) सी आर पी सी अन्वये )

प्रति,

श्री रंजीत चव्हाण (रणजीत रंगराव चव्हाण)
टी वॉर्ड, बृन्हमुंबई महानगर पालीका,
देवीदयाळ रोड, मुलुंड पश्चिम, मुंबई–८०

रा.ठी.– ए/५०४, रूपमाया ईमारत, सेक्टर–०६,ऐरोली, नवी मुंबई, ४००७०८

आपणास या नोटीसा व्दारे कळविण्यात येते की, फिर्यादि श्री. मुकेश प्रताप ठक्कर उर्फ चिकु, वय– ५२ वर्षे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे आपल्या विरूध्द लाचेची मागणी केल्याबाबत लेखी तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २२/१०/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आपण फिर्यादिकडे रू १,६५,०००/–लाच रक्कमेची मागणी केल्याची निष्पण्ण झाल्याने आपल्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई गु.र.क्र. १७/२०२२ कलम ०७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये दिनांक १७/०३/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने आपणाकडे तपास करावयाचा असल्याने आपण सदरची नोटीस प्राप्त होताच सदर गुन्हयाच्या तपासकामी आपण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई. सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३० येथे समक्ष हजर राहुन गुन्हयाच्या तपासात सहकार्य करावे, तसेच यापुढे वेळोवेळी आपणास नमुद गुन्हयाच्या तपासकामी हजर रहाण्याबाबत कळविले असता आपण त्या त्या वेळेस हजर रहाण्याची दक्षता घ्यावी.

आपणास दिलेल्या वेळेत हजर न राहिल्यास पुढिल कायदेशिर कार्यवाहीस आपण सर्वस्वी जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

( अमित सुधाकर म्हात्रे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.
जावक कमांक–२६८९/२०२२

ok

रणजीत
Ranjit Chavan